**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) जिल्हाध्यक्षपदी डॉ. राजेश निमट बिनविरोध



**पाटण**, दि. २ : येथील बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राध्यापक व शिवाजी विद्यापीठ, विद्या परिषद सदस्य प्रा. डॉ. राजेश निमट यांची शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) सातारा जिल्हा अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सांगली येथील सुटा कार्यालयात नुकत्याच झालेल्या वार्षिक सभेत पुढील दोन वर्षांकरिता पदाधिकारी निवडी पार पडल्या. येथील बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राध्यापक व शिवाजी विद्यापीठ विद्या परिषद सदस्य प्रा. डॉ. राजेश निमट यांची अध्यक्षपदी, सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्रा. डॉ. केशव मोरे यांची कार्यवाहपदी निवड झाली. आ. शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा येथील प्राध्यापक व शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. ज्ञानेश्वर काळे यांची खजिनदारपदी निवड झाली.

उपाध्यक्षपदी औंध कॉलेजचे प्रा. डॉ. सुहान मोहोळकर, मुधोजी कॉलेज, फलटणचे डॉ. नवनाथ पुंडलीक रासकर व महिला राखीव उपाध्यक्षपदी उंब्रज येथील एम.एम.एस.जे.महिला महाविद्यालय प्रा. श्रीमती वैशाली सोपान खाडे यांची तसेच सहसचिवपदी दहिवडी कॉलेजचे प्रा. के. एस. शिंदे व यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे डॉ. एस. बी. कांबळे तर महिला राखीवमधून सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या प्रा. डॉ. अनिता राजाराम माळी यांची बिनविरोध निवड झाली. जिल्हा कार्यकारिणीवर प्रा. एन. के. मुल्ला, प्रा. एस. एम. मेस्त्री, डॉ. तानाजी कांबळे व प्रा.डॉ. ईला जोगी यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली.

या सर्व निवडी बिनविरोध झाल्याने सुटा एकसंध असल्याची माहिती सचिव प्रा. डॉ. केशव मोरे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.